# शाळाभेटी आणि वर्गनिरीक्षणातून जिल्ह्याचे शैक्षणिक नियोजन

नंदुरबार जिल्ह्यामधील शिक्षण विभाग आणि जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेसोबत ग्यानप्रकाश फाउंडेशन २०१६ सालापासून काम करत आहे. शैक्षणिक व्यवस्थेच्या उतरंडीमध्ये प्रत्येक स्तरावर काही विशिष्ट शैक्षणिक प्रक्रिया घडणे आवश्यक असते. त्यामध्ये शिक्षण परिषद, पालक परिषद, शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन, मासिक बैठका, शैक्षणिक ग्रामसभा, केंद्र संसाधन समूह बैठका तसेच वर्गपातळीवर मूलनिहाय नियोजन आणि प्रत्येक मुलाचा पोर्टफोलिओ- म्हणजे वर्षभरात त्याने केलेल्या उपक्रमांची, अभ्यासाची एकत्र केलेली माहिती तयार करणे या गोष्टी होणे गरजेचे आहे. या सर्व प्रक्रियांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करता यावी म्हणून ग्यानप्रकाश फाउंडेशन शिक्षण व्यवस्थेच्या प्रत्येक स्तरातील व्यक्तींबरोबर समन्वय साधून हे काम करत आहे.

फेब्रुवारी – मार्च २०२३ या महिन्यांमध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नंदुरबार आणि ग्यानप्रकाश फाउंडेशन यांच्या सहकार्याने एकत्रित शाळा भेटी करण्यात आल्या. या भेटीला ग्यानप्रकाश फाउंडेशनचे प्रतिनिधि, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेतील अध्यापक, प्राचार्य, शिक्षणाधिकारी हे सर्वजण एकत्र गेले होते. गेल्या शैक्षणिक वर्षामध्ये पालकपरिषद, शिक्षणपरिषद, मूलनिहाय नियोजन, मुलांचे पोर्टफोलिओ, शाळा व्यवस्थापन समितीच्या मासिक बैठका आणि त्यांचा शैक्षणिक सहभाग, अध्ययन निष्पत्ती, क्षमताधिष्ठित वर्गप्रक्रिया या प्रक्रिया सातत्याने राबवल्या गेल्या. वर्गपातळीवर आणि विद्यार्थी गुणवत्तेच्या दृष्टीकोनातून त्या किती परिणामकारक ठरल्या हे पाहाण्यासाठी तसेच पुढील शैक्षणिक वर्षाची दिशा ठरवण्याकरता निरीक्षण आणि अनुभव गोळा करण्यासाठी एकूण ३५ शाळांना भेटी देण्यात आल्या. या भेटींमध्ये शाळेमधील वातावरण, वर्गप्रक्रिया यांचे निरीक्षण करणे, विद्यार्थ्यांशी, शिक्षकांशी आणि पालकांशी संवाद साधणे, त्यांच्याबरोबर चर्चा करणे या गोष्टी झाल्या. तसेच मूलनिहाय नियोजन,विद्यार्थी पोर्टफोलिओ अशा निरीक्षण नोंदी पाहाण्यात आल्या. शिक्षकांच्या आणि पालकांच्या शंकांचे निरसन करत त्यांना यंत्रणेकडून कोणती मदत हवी आहे ते समजून घेतले. या भेटींमधून जी माहिती माहिती मिळाली तिच्या आधारावर, तसेच चर्चा व विश्लेषण करून सर्वाधिक गुणवत्तापूर्ण शाळेला “निपुण पंचतारांकित शाळा” म्हणून घोषित करण्यात आले. त्या शाळेतील शिक्षक व पालक यांना प्रोत्साहन मिळावे हा यामागचा हेतू होता. अशा निपुण पंचतारांकित शाळांची यशोगाथा लिहून ती जिल्हा स्तरापासून ते शाळेतील शिक्षकांपर्यंत पोचवण्यात आली आहे.



निपुण पंचतारांकित शाळेने व तिथल्या शिक्षकांनी राबवलेल्या प्रभावी प्रक्रियेची अंमलबजावणी आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे तंत्र पुढील शैक्षणिक वर्षामध्ये जिल्ह्यासाठी आदर्श शाळेचे तंत्र म्हणून धरले जाईल. या निपुण पंचतारांकित शाळांमधील शिक्षकांच्या कार्याची यशोगाथा लिहून ती जिल्हास्तरावर प्रदर्शित करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे जिल्ह्यातल्या इतर शिक्षकांना दिशा मिळू शकेल. तसेच त्यातील काही गोष्टी नवीन शैक्षणिक वर्षात जिल्हास्तरावर सार्वत्रिकपणे राबवल्या जातील.

शैक्षणिक प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी या शाळा भेटींच्या माध्यमातून शिक्षकांना सहकार्य व मार्गदर्शन मिळत आहे. त्यामुळे त्यांच्यात एक नवचैतन्य आलेले असून त्यांना काम करण्यासाठी नवीन दिशा आणि प्रोत्साहन मिळत असल्याचे दिसून येत आहे. पालकांसोबत चर्चा करताना शाळेच्या विकासात आणि मुलांच्या शैक्षणिक प्रक्रियेमध्ये त्यांचा कसा सहभाग होता आणि त्यामुळे मुलांच्या शिकण्यात कोणते बदल दिसून आले हे समजून घेतले जात आहे. त्यामुळे पालकांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन मिळत आहे.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि ग्यानप्रकाश फाउंडेशन यांनी एकमेकांच्या सहकार्याने पार पाडलेल्या शाळा भेटींमुळे शिक्षक आणि पालक यांना मदत होत असून त्यांच्या कामाला दिशा मिळत असल्याचे दिसून येते .




